**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या तैलचित्राचे अनावरण

पाटण : कोयना एज्युकेशन सोसायटी व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व्यक्तिवेध' या पुस्तकाचे प्रकाशन व त्यांच्या तैलचित्राचे अनावरण बुधवार, १५ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजता होणार आहे. हा सोहळा कोयना एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात संपन्न होणार असून प्रकाशन जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांच्या हस्ते व लेखक डॉ. आर. ए. कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. बी. एस. पवार यांनी रेखाटलेल्या कलाम यांच्या तैलचित्राचेही अनावरण या वेळी होणार आहे. कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण यांनी केले आहे.